महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## महानाट्य जाणता राजा निमित्य सिताबर्डी इंटरचेंज येथून शेवटची मेट्रो ट्रेन रात्री १०.३० वाजता




नागपूर : सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ३५० व्या शिवराज्यभिषेक वर्षानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर आधारित महानाट्य `जाणता राजा' कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १३ जानेवारी ते १५

जानेवारी दरम्यान यशवंत स्टेडियम, धंतोली, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. हे महा नाट्य बघायला शहराच्या चारही बाजूने मोठ्या प्रमाणात नागरिक येण्याची शक्यता आहे.

महा नाट्य बघायला आलेल्या दर्शकांना रात्री परतणे सोईचे जावे या करता महा मेट्रोच्या वतीने सिताबर्डी इंटरचेंज येथून चारही मार्गिकांकरता १०.३० मेट्रो ट्रेनची व्यवस्था केली आहे. महा नाट्य बघितल्यावर परतीचा प्रवास सुकर असावा या करता हि सोय करण्यात आली असून या निमित्ताने आलेले नाट्यप्रेमी सिताबर्डी इंटरचेंज येथून लोकमान्य नगर, खापरी, प्रजापती नगर आणि ऑटोमोटिव्ह चौक मेट्रो स्टेशन पर्यंत मेट्रोने प्रवास करू शकतील.

महा मेट्रोची नियमित सेवेचा वापर करत नाट्य प्रेमींनीं यशवंत स्टेडियम पर्यंत प्रवास करावा आणि रात्री परत जाताना देखील याच माध्यमाने परतीचा वापर करावा व करून कार्यक्रमस्थळी होणारी खासगी वाहनांची गर्दी टाळावी हे आवाहन महा मेट्रोच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे. सिताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्टेशन हे यशवंत स्टेडियम येथून ५० मीटर अंतरावर आहे.